6 MAY 2017 महाराष्ट्र टाईम्स जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रवेश परीक्षांना सुरुवात

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

जून २०१७ या वर्षापासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्रातील शिवाजी विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागाच्या प्रवेशपरीक्षांना शुक्रवारपासून सुरूवात झाली. रविवार दि. ७ मे पर्यंत या परीक्षा सुरू राहणार आहेत. यामध्ये एम. ए. एम. कॉम. आणि एम. एस्सी. या अभ्यासक्रमासाठी सर्व विषयांच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत.

बी.ए., बी. कॉम. आणि बी. एस्सी. या शाखांमध्ये पदवीप्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना येत्या शैक्षणिक वर्षापासून पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्याची प्रक्रिया जून पासून सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रवेशपरीक्षांच्या सत्राला सुरूवात झाली. पहिल्या टप्प्यात एम. ए. साठी भाषा आणि सामाजिक शास्त्रांच्या



परीक्षा सुरू झाल्या. तर वाणिज्य शाखेतील अकाउंट, फायनान्स, स्टॅटिस्टिक अशा विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीही परीक्षा सुरू झाली. शास्त्र शाखेतील पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, जीवशास्त्र यामध्ये पदव्युत्तर घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. शिवाजी विद्यापीठ, सायबर कॉलेजसह जिल्ह्यातील तालुकास्तरावरील कॉलेजमध्ये या परीक्षांची व्यवस्था करण्यात आली आहे.

कला शाखेत पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांचा पदव्युत्तर शिक्षणामध्ये राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि मानसशास्त्र या विषयांमध्ये लक्षणीय असल्याचे दिसून आले आहे. पदव्युत्तर परीक्षेसाठी दाखल झालेल्या अर्जांनुसार सामाजिक शास्त्रांमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना असलेल्या अध्यापनक्षेत्रातील संधीमुळे ही संख्या वाढली आहे. तर भाषा विभागामध्ये इंग्रजी आणि मराठीसह संस्कृत विषयातही पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून प्रवेश परीक्षा दिली जात आहे. लेखनाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांनी पदवीनंतर वृत्तपत्र व संवादशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षणासाठीही पसंती दिली आहे. वाणिज्य पदवीधर विद्यार्थ्यांचा कल पदव्युत्तर शिक्षणामध्ये अर्थशास्त्र विषयाकडे आहे. शास्त्र पदवीधर विद्यार्थ्यांमध्ये गणित, संख्याशास्त्र, पदार्थ विज्ञान, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र याविषयाची परीक्षा देणाऱ्यांची संख्या जास्त आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 MAY 2017
पुण्यनगरी

# पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांना प्रारंभ

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाच्या २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांना प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी शुक्रवारी ५ हजार ४३३ विद्यार्थ्यांपैकी ४ हजार ७८९ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन प्रवेश परीक्षा दिली. यामध्ये सर्वात जास्त केमिस्ट्री विषयासाठी ३ हजार ४१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली.विविध अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाकडून प्रवेश परीक्षा घेण्यात येते. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ५ ते ९ मे या कालावधीत ऑनलाईन आणि ऑफलाईन प्रवेश परीक्षा घेण्यात येत आहे. या वर्षी १५० पदवी, तर ३९ पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सुमारे १४ हजार परीक्षार्थींनी नोंदणी केली आहे. यामध्ये ऑनलाईन परीक्षांसाठी ३ हजार २७३, तर ऑफलाईन परीक्षांसाठी १० हजार ८१४ इतक्या परीक्षार्थींचा समावेश आहे. शुक्रवारी एमए, एमएस्सी, भूगोल, मास कम्युनिकेशन, बीजेसी, एमजेसी, एमएस्सी केमिस्ट्री, एमएस्सी अॅग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट आदी विभागांच्या ऑफलाईन प्रवेश परीक्षा घेण्यात आल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 MAY 2017

सकाळ

# चार हजारांवर विद्यार्थ्यांनी दिली प्रवेश परीक्षा

## प्रक्रिया ऑफलाइन : रसायनशास्त्रसाठी सर्वाधिक ३४१८ विद्यार्थ्यांचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठातर्फे झालेल्या अठरा विषयांसाठी ४ हजार ७८९ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन पद्धतीने आज प्रवेश परीक्षा दिली. रसायनशास्त्र विषयासाठी ३ हजार ४१८ इतका विद्यार्थ्यांचा उच्चांकी आकडा राहिला. कोल्हापूर, सांगली, सातारामधील केंद्रांवर परीक्षा झाली.

विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारत, ग्रंथालय व रसायनशास्त्र अधिविभाग, सायबर, सांगलीतील



कस्तुरबाई वालचंद, सातारामधील यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कऱ्हाडमधील सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालय ही परीक्षा केंद्रे होती. येथे सकाळपासूनच विद्यार्थ्यांची परीक्षेसाठी गर्दी होती. एकूण चौतीस अभ्यासक्रमांसाठी ऑफलाइन पद्धतीने प्रवेश परीक्षा होत असून, पैकी अठरा विषयांची आज झाली.

त्यासाठी एकूण ५ हजार ४३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. प्रत्यक्षात ४ हजार ७८९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. रसायनशास्त्र विषयासाठी एकूण ३ हजार ७३६ विद्यार्थ्यांची नोंद होती. त्यातील ३ हजार ४१८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

### विषयनिहाय परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या

- एम. ए.; एम. एस्सी. जिऑग्राफी - ४३५ - एम. ए. मास कम्युनिकेशन - ४७
- केमिस्ट्री - ३४१८ - बी. जे. सी. - १४७ - एम. जे. सी. - १७
- ॲग्रोकेमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट - १८३ - एम. ए. (इंग्रजी) - ५८
- एम. ए. (अर्थशास्त्र) - ७८ - (इतिहास) - ५८ - (हिंदी) - ११
- (मराठी) - १२३ - (तत्त्वज्ञान) - ७ - (मानसशास्त्र)- १३
- (राज्यशास्त्र) - १३१ - (पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन) - ६
- (संस्कृत) - ६ - (समाजशास्त्र) - ५१ - (उर्दू) - ०

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 MAY 2017
तरुण भारत

# डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती विद्यापीठात उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती शुक्रवारी विद्यापीठात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ अतिथीगृहासमोरील डॉ. पवार यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्येही मान्यवरांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. 'डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन' येथेही प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या अर्धपुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत, डॉ. ए.एम. गुरव, डॉ. जी.बी. कोळेकर, डॉ. पी.व्ही. अनभुले, डॉ. संभाजी शिंदे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, माजी कुलसचिव डॉ. डी.व्ही. मुळे, प्रा. सी.एच. भोसले, प्राचार्य मानसिंगराव जगताप, डॉ. बी.एल. पाटील, डॉ. एस.जे. नाईक, डॉ. संभाजीराव कणसे, प्रा.टी.के. सरगर, डॉ. सी.टी. पवार, अशोक साबळे, अनिल वेल्हाळ यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 6 MAY 2017

पुढारी

# आप्पासाहेब पवार हे आमचे दैवत : नलगे

## विद्यापीठात आजी-माजी विद्यार्थी मेळावा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. आप्पासाहेब पवार यांनी दिलेल्या प्रेरणा माझ्यासारख्या अनेकांना आयुष्यभर पुरणारी आहे. असंख्य मुलांचे आयुष्य कमवा व शिका या योजनेच्या माध्यमातून डॉ. पवार यांनी उभे केले. डॉ. पवार हे आमचे दैवत असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे यांनी येथे केले.

कमवा व शिका प्रबोधिनी आणि डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन यांच्यातर्फे डॉ. पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित आजी-माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक नलगे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. कार्यक्रम मानव्यशास्त्र सभागृहात झाला.

ज्येष्ठ साहित्यिक नलगे म्हणाले, डॉ. पवार यांनी विद्यार्थी घडवण्यासाठी सतत प्रयोग केले. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना त्यांच्यामुळे शिक्षणाची संधी मिळाली. डॉ. शिर्के म्हणाले, आजच्या विद्यार्थ्यांनीही डॉ. पवार यांनी सुरू केलेल्या कमवा व शिका या योजनेचा लाभ घेऊन संधीचे सोने करावे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. पवार यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत प्राचार्य डॉ. बी. एल. पाटील यांनी, पाहुण्यांचा परिचय प्रा. टी. के. सरगर यांनी केले. आभार प्राचार्य डॉ. एस. जे. नाईक यांनी मानले.

यावेळी विद्यार्थ्यांना पुरस्कार वितरण करण्यात आले. कार्यक्रमास वैभव कांबळे, नीता साठे आदींसह भवनचे विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 6 MAY 2017
तरुण भारत

# विद्यापीठात संशोधन प्रकल्पांबाबत आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** संशोधन प्रकल्पांचा दर्जा, गुणवत्ता व उपयुक्तता यासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी शनिवारी शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात दुपारी २.३० वाजता मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत विद्यापीठात मे २०१५ पासून विद्यापीठ अधिविभागासह संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक यांच्या संशोधन प्रकल्पांना आर्थिक सहाय्य दिले जाते. तरी अधिविभागांसह संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रसायनशास्त्र अधिविभागातील राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या योजनांचे समन्वयक प्रा. एस.आर. पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 6 MAY 2017
सकाळ

# संशोधन प्रकल्पांबाबत आज शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ५ : संशोधन प्रकल्पांचा दर्जा, गुणवत्ता व उपयुक्तता या संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी उद्या (ता. ६) शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय कार्यशाळा होत आहे, अशी माहिती राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या योजनांचे समन्वयक प्रा. एस. आर. पाटील यांनी दिली. राजर्षी शाहू सभागृहात दुपारी अडीच वाजता कार्यशाळेस सुरवात होईल. राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत विद्यापीठ अधिविभागासह संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक यांच्या संशोधन प्रकल्पांना आर्थिक साह्य दिले जाते. उपक्रमाअंतर्गत आठ संशोधन प्रकल्पांचे कार्य विद्यापीठ व महाविद्यालयांतील प्रयोगशाळांत सुरू आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून कार्यशाळा होत आहे. आयोगाचे सचिव डॉ. ए. व्ही. सप्रे, सल्लागार प्रा. व्ही. व्ही. महाजनी व पुण्याच्या राष्ट्रीय रसायन प्रयोगशाळेतील (एनसीएल) शास्त्रज्ञ डॉ. पी. पी. वडगावकर मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 MAY 2017
सकाळ

# शिक्षणशास्त्र विभागात उद्‌बोधन कार्यक्रम

कोल्हापूर, ता. ५ : महाराष्ट्र शासनातर्फे उद्या (ता. ६) एम. एड. केंद्रीय सामायिक प्रवेश प्रक्रियेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात एकदिवसीय उद्‌बोधन कार्यक्रम होत आहे. शिक्षणशास्त्र अधिविभागात सकाळी साडेदहा वाजता कार्यक्रमास सुरवात होईल. कार्यक्रमासाठी शुल्क आकारले जाणार नाही. तरी विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 MAY 2017
सकाळ

# निसर्गोपचारासह चार अभ्यासक्रम १५ मेपासून

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे निसर्गोपचार, सूत्रसंचालन, रोपवाटिका (नर्सरी), प्राथमिक योग अभ्यासक्रमांचे वर्ग येत्या १५ मे पासून सुरू होणार आहेत. इच्छुकांनी प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन विभागाच्या प्रभारी संचालक डॉ. सुमन बुवा यांनी केले आहे. निसर्गोपचार उपचार पद्धती आबालवृद्धांना स्वास्थ्य रक्षणार्थ उपयुक्त आहे. सूत्रसंचालन अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थी व हौशी व्यक्तींसाठी आकाशवाणी, दूरदर्शन, ध्वनी चित्रफीत, वाद्यवृंद, वृत्तपत्र, डबिंग, जाहिरात अशा अनेक क्षेत्रांमध्ये सूत्रसंचालन करण्याचे कौशल्य आत्मसात करण्यासाठी लागणारे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. रोपवाटिका(नर्सरी) अभ्यासक्रमांतर्गत रोपवाटिका (नर्सरी) व बागकामाचे कौशल्य साध्य करून घेण्याचे प्रशिक्षण प्रात्यक्षिकांद्वारे देण्यात येणार आहे. प्राथमिक योग (योग शिक्षक प्रमाणपत्र) हा अभ्यासक्रम योग शिक्षकांची गरज पूर्ण करू शकेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 MAY 2017
Times of India

# SUK offers courses in yoga, nursery, naturopathy

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The continuing education and extension department of the Shivaji University, Kolhapur (SUK) is offering four new courses in naturopathy, anchoring, yoga and nursery starting from May 15.

Acting director of the department, Suman Buwa said that there are limited seats available for the courses and the admission will be given on first come first serve basis.

Buwa told **TOI**, " Among the basic eligibility, The applicant must have completed class X to get admitted to the course. These courses are designed to provide maximum employment opportunities to the students. We have jointly taking up the course with the local yoga groups. We have recruited Yoga teachers who will be train the students in the best possible manner. The course duration will vary in all these courses."

"The duration for the naturopathy course is one year and the fee is Rs 10,000. While for the yoga course, the fee is Rs 5,000 and the duration is nine months. Whereas, the basic courses like nursery and anchoring require less time and will be completed within three months and one month respectively, with a nominal fee of Rs 2,000 and Rs 1,000," she added. According to Buwa, local and national experts from the respective fields will mentor these classes.

"Interested candidates can apply for the said courses within the stipulated deadline. For more details they can contact on 0231-2609150 or 9011001514 number," an SUK circular read.

जनसंपर्क कक्ष
6 MAY 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# झिनत गोरवाडे, अभिषेक खोत यांना शिवाजी विद्यापीठाची शिष्यवृत्ती



झिनत गोरवाडे,



अभिषेक खोत

**रूकडी :** येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयातील झिनत इम्तियाज गोरवाडे (बीए भाग १) व अभिषेक राजाराम खोत (बी.कॉम. भाग १) या विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाची प्रत्येकी ५००० रूपयांची गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळाली आहे. झिनत गोरवाडे हिला भारत सरकारची १०,००० रूपयांची गुणवत्ता शिष्यवृत्तीही मिळाली आहे. इयत्ता बारावी ते बी. ए. भाग १ या शैक्षणिक वर्षात तिने मिळविलेल्या परीक्षेतील गुणवत्तेसाठी तिला या शिष्यवृत्ती देण्यात आल्या. त्यांचे बाळासो माने एज्युकेशन ट्रस्टच्या शिक्षण संकुलातील सर्व शाखा प्रमुख, शिक्षकवृंद आणि संस्थाध्यक्षा निवेदिता माने, सचिव धैर्यशील माने यांनी अभिनंदन केले.